## निशाणी २२ खालील आदेश

१. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १,२,६,७,९ ते ११ यांनी दावा मिळकतीची प्रत्यक्ष Actual व Facutal परिस्थिती कोर्टासमोर येण्यासाठी कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये दाखल केलेला आहे.

### प्रतिवादींचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;

२. प्रस्तुतचा दावा निरंतरचे मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे म्हणणे की, सदर दावा मिळकतीबाबत प्रस्तुतचा दावा दाखल होण्याअगोदरच प्रतिवादी नं. १ ने रे.मु.नं. ३१०/२०१९ चा दावा दाखल केलेला होता व आहे. सदर प्रतिवादी नं.१ चा दावा त्यांनी सब रजि. कार्यालय श्रीगोंदा येथे मालमत्ता हस्तांतर कायदा कलम ५२ नुसार नोंदवलेला असताना आणि दावा मिळककतीचे हस्तांतर करु नये अशी जाहीर नोटीस पेपरला दिलेली असताना देखील बिगर कब्जाचे दावा मिळकतीचे संदर्भात खरेदीचा दस्त नोंदवून घेतला तो दस्त प्रवितादींनी वादींच्या विरोधात आव्हाणित केलेला आहे. सदरचा ताबा प्रतिवादींकडे वडिलोपार्जित मिळकतीतील कुटुंब व्यवस्थेतून प्रस्थापित झालेला आहे. वादींनी बळजबरीने मिळकतीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न केला.सदरचा दाव्यातील मिळकतीचा ताबा प्रतिवादींकडे सन १९९१ पासून ते आजपर्यंत आहे. दावा मिळकतीमध्ये विहीर, पाईपलाईन, इले. कनेक्शन, मोटार देखील आहे. त्यामुळे दावा मिळकतीबाबतची प्रत्यक्षात Actual व Factual वस्तुस्थिती कोर्टासमोर येण्यासाठी कोर्ट कमिशनरची नेमणूक करण्यात यावी. प्रतिवादीने त्याच्या समर्थनामध्ये मा. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालय यांचा निवाडा Baliram Vs. Melaram (LAWS( HPH)2002 8 11 ) Wherein it has been held that Local commissioner can be appointed to investigate and report actual and Factutal position of the construction व मा. राजस्थान उच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा smt. Vimla Sharma Vs. Registrar, Co–operative Societies and ors.( LAWS( RAJ) 1997 4 49) Wherein it has been held that there is no need to appoint commissioner under 26 rule 9 CPC as plaintiff can produce evidence on record regarding the same.

**३.** वादी याने नि. क्र. ४७ वर त्याचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास आक्षेप घेतलेला आहे. वादीने त्याच्या समर्थनामध्ये मा. मुंबुई उच्च न्यायालय यांचा निवाडा Dhondiram Nivrutti Pawar Vs. Laxman Khashaba Pawar( Civil Writ Petition No. 1196/2017 Where is it has been held by the Hon'ble High Court that Machinary of the Court can not be used for purpose of collecting evidence and hence the application of the defendant for appointing Court commissioner is rejected. म्हणून सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**४.** वादीने सदर दावा मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. वादीचे दाव्यातील मागणी पाहिली असता त्यांने प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीर प्रवेश करु नये या करिता दाखल केलेला आहे. वादीने सदर दावा अतिक्रमण दुर करुन मिळणेकरिता दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांनी सदर केसमध्ये कोणतीही मागणी केलेली नाही. त्यामुळे दावा मिळकतीची पाहणी करण्याची आवश्यकता नाही. पुढे वादी व प्रतिवादी याने त्याच्या समर्थनामध्ये दाखल केलेला निवाडा Dhondiram Nivrutti Pawar Supra व smt. Vimla Sharma supra सदर केस मध्ये लागू होत आहे. प्रतिवादी यांनी आधार घेतलेला न्यायनिवाडा Baliram Supra हा मा. राजस्थान हायकोर्टचा असल्यामुळे व Dhondiram Nivrutti Pawar Supra हा मा. मुंबुई उच्च न्यायालय यांचा न्यायनिवाडा असल्यामुळे सदर न्यायनिवाडा या कोर्टावरती बंधनकारक आहे. त्यामुळे सदर अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. वादी चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

दिनांकः १८.०२.२०२२

**( एन. एस. काकडे )**
**दिवाणी न्यायाधीश व.स्तर श्रीगोंदा**

.